-B /letter- 1035 -

<u>लोकशाही दिन संदर्भ</u>

जा.क्र.मुंबई/एमवि/उनि/बी/हौ/१३६८/११

का र्या ल य

उपनिबंधक, सहकारी संस्था, एम-विभाग, मुंबई.

कोकण भवन,दुसरा मजला, नवीमुंबई-४०००६१४

दिनांक :-२६/०८/२०११

प्रति,

चेअरमन/सेक्रेटरी

नवमुंजाळनगर को-ऑप हौसिंग सोसा.लि.

मुंजाळनगर नं.२, अमर महल सिग्नल जंक्शन, पूर्व द्रुतगती मार्ग समोर,

चेंबूर, मुंबई - ४०० ०८९

**विषय :- नवमुंजाळ नगर को-ऑप हौसिंग सोसा.लि.**

---

**श्रीमती मालिनी शेट्टी यांचा शेअर्स सर्टिफिकेट मिळणेबाबतचा तक्रार अर्ज.**

आपले लक्ष वरील विषयाकडे वेधण्यात येत आहे.

२/- उपरोक्त विषयाबाबत श्रीमती मालिनी शेट्टी, यांनी मा. जिल्हाधिकारी, मुंबई पूर्व उपनगर यांचेकडे दि. ३१ जुलै २०११ रोजी टोकन क्र. १३३/२०११ अन्वये अर्ज सादर केला असून आपल्या संस्थेतील फ्लॅट नं. बी-१२ हा श्रीमती मालिनी शेट्टी यांचे पती श्री संजीव शेट्टी यांनी बक्षीस पत्राने पत्नी श्रीमती मालिनी शेट्टी यांना दिला असून त्यांनी सन २००५ मध्ये आपल्या संस्थेस शेअर्स ट्रान्सफर करण्याबाबत विनंती केली होती. तथापि, अद्याप त्यांचे नावावर सदरचा फ्लॅट ट्रान्सफर करण्यात आला नसल्याने त्यांनी दि. २७/०६/२०११ रोजीच्या पत्रासोबत मूळ शेअर्स सर्टिफिकेट जोडून सदरच्या शेअर्स सर्टिफिकेटवर नोंदी घेण्यासाठी संस्थेकडे दिला होता. तसेच आवश्यक कागदपत्रे व प्रवेश फी रु. १००/- भागाची रक्कम रु. ५००/- सुद्धा संस्थेकडे जमा केल्याचे त्यांनी नमुद केले आहे. परंतु आपण दि. ४ ऑगस्ट २०११ रोजीच्या पत्राने आपल्या संस्थेच्या वकिलानी दिलेल्या सल्ल्यानुसार त्यांना ट्रान्सफर फी रु. २०,०००/- (अक्षरी वीस हजार) भरणा करण्याबाबत कळविलेले आहे. याबाबत उपविधी क्र. ३८ (९) मधील तरतुदीनुसार संस्थेच्या भाग भांडवलामध्ये मालमत्तेतील सभासदाचे भाग व हितसंबंध त्याच्या कुटुंबियांमध्ये किंवा त्याने निर्देशित केलेल्या व्यक्तीसाठी अथवा मृत्यूनंतरचा कायदेशीर वारसाच्या नावे किंवा सभासदांमधील आप आपसातील बदलास तसेच बक्षीस पत्राद्वारे फ्लॅट दिला असल्यास ट्रान्सफर फी लागू असणार नाही, अशी तरतुद आहे. आपल्या संस्थेतील फ्लॅट नं. बी-१२ हा श्रीमती मालिनी शेट्टी यांना त्यांचे पती श्री संजीव शेट्टी यांनी बक्षीस पत्राने दिलेला असल्यामुळे सदरचा फ्लॅट कुटुंबियामध्ये ट्रान्सफर करावयाचा असल्यामुळे आपणांस ट्रान्सफर फी मागणी करता येणार नाही. तरी याबाबत आपणांस कळविण्यात येते की, याबाबत सहकार विभागाने व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार तसेच उपविधीतील तरतुदीनुसार १५ दिवसांचे आत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. याबाबत आपणांकडून विहीत मुदतीत कार्यवाही न झाल्यास आपणांविरुद्ध पुढील योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-

उपनिबंधक,

सहकारी संस्था,एम विभाग,मुंबई

<u>प्रत</u>

१) श्रीमती मालिनी संजीवा शेट्टी फ्लॅट नं.१२, बी बी विंग, नवमुंजाळनगर को-ऑप हौसिंग सोसा.लि. मुंजाळनगर नं.२, अमर महल सिग्नल जंक्शन, पूर्व द्रुतगती मार्ग समोर, चेंबूर, मुंबई - ४०० ०८९

<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u>

१) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(२), पूर्व उपनगर, मुंबई यांना त्यांचे कार्यालयाकडील पत्र जा.क्र मुंबई/ जिउनि२/बी-१/११७३/२०११ दि. ०२/०८/२०११ अन्वये सविनय सादर.

उपनिबंधक,

सहकारी संस्था,एम विभाग,मुंबई